## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 12/06/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## प्रसिद्ध चरित्र लेखक दीनानाथ तेंडुलकर

दीनानाथ गोपाळ तेंडुलकर हे एक भारतीय लेखक आणि माहितीपट निर्माते होते. ते महात्मा गांधींच्या आठ खंडांच्या चरित्राचे लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म महाराष्ट्रातील रत्नागिरी (त्यावेळी बॉम्बे प्रेसिडेन्सी म्हणून ओळखले जाणारे) येथे झाला आणि त्यांचे शिक्षण प्रथम केंब्रिज विद्यापीठात आणि नंतर मारबर्ग आणि गॉटिंगेन विद्यापीठांमध्ये झाले. तेंडुलकर यांना महात्मा गांधींचे आठ खंडांचे चरित्र, ज्याचे शीर्षक 'महात्मा: मोहनदास करमचंद गांधी' आहे. ते लिहिण्यासाठी आंतरराष्ट्रीय ख्याती मिळाली. त्यांचे सर्वात प्रसिद्ध काम म्हणजे त्यांचे गांधी चरित्र, जे पहिल्यांदा १९५१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या प्रस्तावनेसह प्रकाशित झाले. तेंडुलकर यांचे १९६७ चे खान अब्दुल गफार खान यांचे चरित्र 'फेथ इज अ बॅटल', हे गफार खान यांच्या लिहिलेल्या काही मोजक्या चरित्रांपैकी एक आहे.

१९५७ मध्ये जेव्हा नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडियाची स्थापना झाली तेव्हा त्यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या इतर कामांमध्ये थर्टी मंथ्स इन रशिया (१९४३), गांधी इन चंपारण (१९५७) आणि सोव्हिएत संस्कृती यांचा समावेश आहे. त्यांनी जवाहरलाल नेहरू इन पिक्चर्स (१९६७) आणि गांधीजी : हिज लाईफ अँड वर्क्स (१९४४) ही दोन पुस्तके देखील संपादित केली आहेत. तेंडुलकर हे एक डॉक्युमेंटरी फिल्ममेकर देखील होते. ज्यांनी मॉस्कोमध्ये सर्गेई आयझेनस्टाईन यांच्याकडून प्रशिक्षण घेतले होते. त्यांना तत्कालीन राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले. त्यांनी पुरस्कार नाकारला आणि त्याऐवजी घड्याळ मागितले (आणि मिळवले). दीनानाथ तेंडुलकर यांचे १२ जून १९७२ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Jun 12, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

सकाळ

# शिक्षण घेतानाच २२८ विद्यार्थ्यांना नोकरी

## बाभूळगावच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये प्लेसमेंटमधून नामांकित कंपन्यांमध्ये निवड

**सकाळ वृत्तसेवा**

येवला, ता. ९ : शिक्षण घेताना शेवटच्या वर्षातच नोकरी लागली तर होणारा आनंद गगनापार असतो. बाभूळगाव येथील जगदंबा एज्युकेशन संस्थेच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये वर्षभरात तब्बल २२८ विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरीची संधी मिळाली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एसएनडी पॉलिटेक्निक येथे आयोजित पूल कॅम्पसमध्ये या विद्यार्थ्यांची विवीध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. संस्थेने आणखी एक यशाचे शिखर गाठले आहे. विद्यार्थांना औद्योगिक क्षेत्राची माहिती व्हावी यासाठी तज्ज्ञांचे व्याख्यान व विविध कंपन्यांना भेटी देऊन तेथे होत असलेल्या कामाची रूपरेषा कशी असते याविषयी मार्गदर्शन आयोजित केले जाते. पुणे येथील टाटा मोटर्स मध्ये ५० विद्यार्थ्यांची निवड झाली. नाशिक येथील बॉश कंपनीमध्ये मेकॅनिकल अभियांत्रिकीचे १७ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीचे १८, मुंबई येथील भारत गिअर कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या ३५ विद्यार्थांची, अहिल्यानगर येथील माय इंडिया कंपनीत मेकॅनिकलचे १८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलचे २२ विद्यार्थ्यांची निवड झाली. संभाजीनगर येथील बजाज ऑटो कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या २८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलच्या २५ विध्यार्थांची निवड झाली. नाशिक येथील स्कायवे ग्रुपमध्ये सिव्हील इंजिनिअरिंगच्या १५ विद्यार्थ्यांची निवड झाली. विविध कंपन्यांमध्ये निवड झालेल्या विध्यार्थांना प्रतिवर्ष सरासरी ३-४ लाख रुपये पगार व कंपनीच्या विविध सुविधा मिळणार असल्याची माहिती प्राचार्य उत्तम जाधव यांनी दिली. संस्थेचे कार्यकारी संचालक रुपेश दराडे, प्राचार्य जाधव यांच्यासह विभागप्रमुख संदीप असुदे, गणेश चव्हाण, शोराब शेख, रविकुमार ताकसांडे, विजय गंडोळे, प्रवीण लहरे, संतोष माकुने आदींनी विध्यार्थांचे अभिनंदन केले.



**बाभूळगाव** : कॅम्पस प्लेसमेंटमधून नोकरीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयाचे प्राध्यापक.

> एसएनडी कॅम्पसमध्ये उपलब्ध अत्याधुनिक सुविधेमुळे तसेच विद्यार्थ्यांना शिकत असतानाच कॅम्पस मुलाखती व कंपन्यांसंदर्भात ज्ञान व माहिती देण्याचा प्रयत्न होतो. त्याचे फलित म्हणजे अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरी मिळत आहे याचा संस्थेला अभिमान वाटतो.
> - **रूपेश दराडे**, संचालक, मातोश्री शिक्षण संस्था, येवला.

Nashik, District-Today
10/06/2025 Page No. 3